दरपत्रक फॉर्म किमंत रु.500/- ना परतावा


# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


**दरपत्रक क्र.कोविमं/भांडार/K-11/कार्यालयातील ऑफिस स्विपिंग व खाकी रिकामी पाकिटे रद्दी विक्री** /2024-2025/1802

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - 416 004 या कार्यालयामधील सन 2024 - 2025 या कालावधीकरिता ऑफिस स्विपिंग व खाकी रिकामी पाकिटे रद्दी विक्रीसाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर दरपत्रकाच्या अंदाजित मूल्य (Estimated Cost) रू.1,00,000/- (रूपये एक लाख फक्त) आहे. त्यासाठी खालील अटी व शर्तीस अधिन राहून सोबत जोडलेल्या परिशिष्ट " ब " मधील तपशिलानुसार सीलबंद दरपत्रके **दिनांक** 29/08/2024 **ते दिनांक** 06/09/2024 या कालावधीत मागविण्यात येत आहेत.

**दिनांक** 06/09/2024 **रोजी दुपारी 5.00 नंतर** प्राप्त होणारी दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**दरपत्रकासाठी 'अ ' व ' ब ' लिफाफा पध्दत आहे.**

## 'अ ' लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे

1. GST नोंदणी प्रमाणपत्राची छायाप्रत
2. पॅनकार्ड छायाप्रत.
3. अनुभव दाखला
4. सन 2022-2023 चे आयकर भरणा विवरणपत्र / पोहोच साक्षांकित प्रत (Returns / Acknowledgement)
5. बयाणा रक्कम रु.3,000/- चा धनाकर्ष (D.D.). बयाणा रक्कमेचा धनाकर्ष (D.D.) **विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर** या नावाने राष्ट्रीयकृत बॅकेचा असावा. बयाणा रक्कम धनादेश स्वरुपात स्विकारली जाणार नाही. तसेच लघु उदयोजक नोंदणी अथवा रजिस्टर्ड सोसायटी अशा दरपत्रकधारकांना बयाणा रक्कम भरण्यापासून सूट मिळणार नाही. तसेच मंडळाकडे जमा असलेली व अन्य दरपत्रकासाठी भरलेली बयाणा रक्कम प्रस्तूत दरपत्रकासाठी ग्राहय धरली जाणार नाही.

## ' ब ' लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे

1. मंडळाचे अधिकृत दरपत्रक

## अटी व शर्ती

1. दरपत्रकातील अटी व शर्तीप्रमाणे 'अ ' लिफाफा (तांत्रिक) मधील माहिती परिपूर्ण व निकषानुसार असल्याशिवाय लिफाफा 'ब ' (दरपत्रक) उघडला जाणार नाही.
2. दिलेल्या दरामध्ये रद्दीची बांधणी तसेच वाहतुक, हमाली इ. सर्वच खर्चाचा समावेश असावा. दर सर्वकरांसह असणे आवश्यक आहे.
3. कार्यालयीन ऑफिस स्विपिंग व खाकी रिकामी पाकिटे रद्दी विक्रीसाठी रद्दी विक्री कामासबंधीचा व्यवसाय परवाना व अनुभवाचा दाखला सादर करण्याऱ्या ठेकेदारांस प्राधान्य देण्यात येईल.
4. कार्यालयीन ऑफिस स्विपिंग व खाकी रिकामी पाकिटे रद्दी विक्रीची उचल सकाळी 11.00 ते 04.00 या वेळेत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करावी लागेल.
5. कार्यालयीन ऑफिस स्विपिंग व खाकी रिकामी पाकिटे रद्दी विक्रीसाठी ठेकेदारांनी स्वखर्चाने जशी असेल तशी या तत्वावर कार्यालयातून उचलून घेऊन जाणेची आहे
6. रद्दी मालाचे वजन मंडळाचे प्रतिनिधी समोर वजन काट्यावर करावे लागेल

7. ऑफिस स्विपिंग व खाकी रिकामी पाकिटे रद्दी कार्यालयीन वेळेत सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून पाहता येईल.
8. मान्य दरपत्रकधारकास रद्दी उचलणेबाबत विहित नमुन्यात **स्वखर्चाने रूपये 500/- रक्कमेच्या मुद्रांक पेपरवर करार** करणे बधंनकारक राहिल.
9. कार्यालयाने वेळोवेळी कळविल्यानुसार रद्दीची उचल करावी लागेल. रद्दीची उचल करण्यास विलंब झाल्यास प्रतिदिनी रू.100/- प्रमाणे दंड आकारण्यात येईल.
10. दरपत्रकातील मान्य दर हे प्रथम आदेश दिल्यापासून एक वर्ष कालावधीसाठी बंधनकारक राहतील.
11. कोणतेही दरपत्रक स्वीकारणे वा नाकारणे यांचे अंतिम अधिकार मंडळाने राखून ठेवले आहेत.
12. मान्य ठेकेदारांनी कार्यालयीन ऑफिस स्विपिंग व खाकी रिकामी पाकिटे रद्दीचे वजन होताच त्याची संपूर्ण रक्कम (एक रक्कमी) रोखीने मंडळात जमा करावयाची आहे.
13. मान्य ठेकेदाराने कार्यालयीन ऑफिस स्विपिंग व खाकी रिकामी पाकिटे रद्दी वेळेत न उचलल्यास दिलेले आदेश रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार मंडळास राहील. त्याबाबत कोणतेही तक्रार मान्य केली जाणार नाही. याबाबत मंडळाकडून दंडात्मक कार्यवाही करावी लागल्यास ती आपणांवर बंधनकारक राहिली.
14. मान्य ठेकेदारास **रूपये 5,000/- (रुपये पाच हजार फक्त) ची रक्कम सुरक्षा ठेव** म्हणून जमा करावी लागेल. सदर रक्कमेवर कोणतेही व्याज वा लाभांश मंडळाकडून देय असणार नाही. निर्धारित कालावधी संपुष्टात आल्यानंतर संबधितांच्या मागणीपत्राच्या आधारे सुरक्षा ठेव परत करण्यात येईल. सदर कालावधीतील काम असमाधानकारक आढळल्यास सुरक्षा ठेव जप्त करण्याचे अधिकार मंडळास राहतील.
15. आवश्यकतेनुसार कराराची मुदत वाढविणेचे अथवा कमी करणेचे अधिकार विभागीय मंडळास राहतील. जर करारास मुदतवाढ दिली तर वाढीव कालावधीचा करारनामा करुन पूर्वीच्याच दराने काम पूर्ण करुन द्यावे लागेल.
16. कराराच्या कालावधी दरम्यान उपरोक्त संदर्भात जर काही वाद/तंटा उद्‌भवल्यास तो फक्त कोल्हापूर येथील न्यायालयाच्या (कोर्टाच्या) कार्यकक्षेतच चालेल.

**दरपत्रक अटी व शर्ती फॉर्म दरपत्रकधारकाने स्वाक्षरी करून शिक्क्यासह जोडणे आवश्यक आहे.**

**(सुभाष रा. चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.**

स्थळ : कोल्हापूर
दिनांक:

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**
**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

## परिशिष्ट -" ब "

### क्र.कोविमं/भांडार/K-11/कार्यालयातील ऑफिस स्विपिंग व खाकी रिकामी पाकिटे रद्दी विक्री / 2024-2025 चे अधिकृत दरपत्रक

दरपत्रकधारकाचे नांव : ------------------------------------------------------------------------------------------

पत्ता : ------------------------------------------------------------------------------------------

दूरध्वनी / मोबाईल क्रमांक : ------------------------------------------------------------------------------------------

| अ. क्र. | तपशील | प्रति किलो दर रूपये (सर्व करासहित) |
|---|---|---|
| 1 | **कार्यालयीन ऑफिस स्विपिंग व वापरलेली रिकामी खाकी पाकीटे रद्दी विक्रीबाबत.** | रूपये :<br><br>(अक्षरी: |

मी दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती वाचल्या असून, त्या मला मान्य असून त्यानुसार मी उपरोक्तप्रमाणे दर नमूद केला आहे व तो माझेंवर बंधनकारक राहील अशी हमी देतो.

**स्थळ : कोल्हापूर**
**दिनांक: / /2024**

**दरपत्रकधारकाची सही व रबरी शिक्का**